## **परिपत्रक क्रमांक 265/88**

**विषय :- कलम 41 क प्रमाणे पैसे जमा वा देणग्या जमा करण्याऱ्यासाठी देण्यात येणारी परवानगी**
**(हया अगोदरची परिपत्रके क्र. 202 व 233 पहावीत)**

मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 अन्वये करण्यात आलेल्या कलम 41 क मधील तरतूदीखाली विभागीय अधिकाऱ्यांकडे देणग्या/वर्गणी वा पैसे जमा करण्याच्या वेळी परवानगीसाठी परिपत्रक 202 सोबत असलेल्या अपेंडीक्स 'क' प्रमाणे अर्ज येतात. तसेच अपेंडीक्स 'ड' प्रमाणे विभागीय अधिकाऱ्यातर्फे अर्जदारांना परवानगी देण्यांत येते. परवानगी देताना जोडपत्रे 'ए' प्रमाणे अटी घातल्या जातात. हया अटींमुळे परिपत्रक 233 प्रमाणे हया अगोदर सुधारणा करण्यात आली आहे.

वरील प्रमाणे परवानगी दिल्यानंतरही असे दिसून आले आहे की, वर्गणी गोळा करणाऱ्या व्यक्तिंकडून वर्गणी गोळा करताना काही ठिकाणी व काही बाबतीत वर्गणी देणाऱ्यांवर दबाव आणला जातो. त्यामुळे तक्रारींना वाव मिळतो. हया तक्रारी यापुढे होऊ नयेत वा कमी व्हाव्यात यासाठी परवानगी देताना आणखी काही अटी घालणे जरुरीचे आहे काय याचा विचार करण्यात आला. जर वर्गणी मिळविण्यासाठी काही बळजबरी झाली, तर मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 खाली विशिष्ट कारवाई करता येणार नाही, असे वाटते. तरीपण अशी वर्गणी गोळा करणाऱ्या व्यक्तिंनी सदरील वर्गणी गोळा करताना कोणावरही वर्गणी देण्याची सक्ती वा धाकदपटशा करु नये, अशा सूचना देण्यात याव्यात. त्यासाठी खालील प्रमाणे अट परिपत्रक क्र. 202 च्या अपेंडीक्स 'डी' मध्ये घालावी. अशी अट क्र. 1 ला असावी.

अट खालील प्रमाणे :-

1/- सदरील परवानगीप्रमाणे वर्गणी गोळा करताना वर्गणी गोळा करण्यासाठी जबाबदार असलेल्या व्यक्तिंनी वा त्यांच्यातर्फे वर्गणी गोळा करणाऱ्या व्यकिंतनी वर्गणी मिळविण्यासाठी कोणावरही सक्ती वा धाकदपटशा करु नये.

मा.मु.टुले,
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,मुंबई.

दिनांक :- 17/12/1988